जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 SEP 2019
तरुण भारत

# गुणवंत महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार

## विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती: अभियांत्रिकी, विधी, समाजशास्त्र महाविद्यालयांचा समावेश

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान अधिविभाग सभागृहात मंगळवारी दुपारी सन २०१८-२०१९ या शैक्षणिक वर्षातील शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमधील गुणवंत महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा गुणगौरव समारंभ उत्साहात पार पडला. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू, प्रा. डॉ. डी. टी. शिर्के होते.

**गौरविण्यात आलेली गुणवंत महाविद्यालये-कला विद्याशाखा :** शहरी गट : छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा, निमशहरी गट : सदगुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड, (जि. सातारा) (समान गुण), यशवंतराव चव्हाण आर्टस अॅन्ड कॉमर्स कॉलेज, उरूण इस्लामपूर, (जि. सांगली), ग्रामीण गट : श्रीपतराव चौगुले आर्टस अॅण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली, (जि. कोल्हापूर)

**वाणिज्य विद्याशाखा :**

शहरी गट : डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, (कोल्हापूर) निमशहरी गट : श्री. व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी, (जि. कोल्हापूर) ग्रामीणं गट : श्री. शिवशाहू महाविद्यालय, सरूड, (जि. कोल्हापूर)



कोल्हापूर : प्राचार्यांचा सत्कार करताना प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.

**विज्ञान विद्याशाखा :**

शहरी गट : विवेकानंद कॉलेज, (कोल्हापूर)निमशहरी गट : शिवराज महाविद्यालय साहित्य, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, (जि. कोल्हापूर)

ग्रामीण गट : दूधसाखर महाविद्यालय, बिद्री, (जि. कोल्हापूर)

**अभियांत्रिकी विद्याशाखा :**

शहरी गट : तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, (कोल्हापूर)निमशहरी गट : डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, जयसिंगपूर (जि. कोल्हापूर) ग्रामीण गट : तात्यासाहेब कोरे इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड टेक्नॉलॉजी, वारणानगर, (जि. कोल्हापूर)

**विधी विद्याशाखा :**शहरी गट : शहाजी लॉ कॉलेज, (कोल्हापूर) शिक्षणशास्त्र निमशहरी गट : संस्थामाता सुशिलादेवी साळुंखे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, तासगाव, (जि. सांगली .)

**सामाजिक शास्त्रे**

शहरी गट : यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ सोशल वर्क, जकातवाडी, (जि. सातारा).

लोकमत

# 'एम.बी.ए.'चे प्रवेश सुरु; १५०० जागा

## प्रक्रिया प्रारंभाला विलंब : प्रवेशावर परिणाम होण्याची शक्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : मास्टर ऑफ बिझनेस अॅडमिनीस्ट्रेटर (एम. बी. ए.) या अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षाची प्रवेशप्रक्रिया मंगळवार (दि. ३ सप्टेंबर) पासून सुरु झाली. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एकूण २४ महाविद्यालय, शैक्षणिक संस्थांमध्ये या अभ्यासक्रमाच्या सुमारे १५०० जागा उपलब्ध आहेत. प्रक्रिया सुरु होण्यास विलंब झाल्याने त्याचा परिणाम प्रवेशित विद्यार्थ्यांवर होणार आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या प्रवेश प्रक्रिया विभागाकडून या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु झाली; मात्र पहिल्या फेरीतील जागा वाटपाच्या व्यस्त प्रमाणामुळे मुंबईतील एक शैक्षणिक संस्था या प्रक्रियेविरोधात न्यायालयात गेली. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया स्थगित झाली. सोमवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. त्यात प्रवेशप्रक्रिया थांबवू नये, असा आदेश न्यायालयाने दिला. त्यानुसार पुन्हा प्रवेशप्रक्रिया सुरु झाली; प्रवेश अर्ज भरलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. प्रवेशप्रक्रिया दि. १८ सप्टेंबरपूर्वी पूर्ण करावयाची आहे. त्यात प्रवेशाच्या तीन फेऱ्या होणार आहेत.

> यावर्षी प्रवेश प्रक्रियेला विलंब झाला आहे. त्याचा परिणाम प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर होण्याची शक्यता आहे. एम. बी. ए. अभ्यासक्रमाच्या गेल्यावर्षी ४० टक्के जागा रिक्त राहिल्या होत्या.
>
> - **डॉ. ए. एम. गुरव,** अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग, शिवाजी विद्यापीठ

**जिल्हानिहाय आकडेवारी**

| जिल्हा | महा-विद्यालय | उपलब्ध जागा |
|---|---|---|
| कोल्हापूर | ८ | ४८० |
| सांगली | ९ | ५४० |
| सातारा | ७ | ४२० |

# कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा सत्कार

## शिक्षक दिनाचे औचित्य, पूरस्थितीत मदत केल्याबद्दल मानले आभार

**कोल्हापूर / प्रतिनिधी :** शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा शिक्षक दिनाच्या निमित्ताने बी वॉर्ड अन्याय निवारण कृती समिती आणि हुतात्मा क्रांती सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सत्कार करण्यात आला. पूर परिस्थितीमध्ये कुलगुरू शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाने केलेल्या मदतकार्याबद्दल समस्त कोल्हापूरवासीयांतर्फे कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

याप्रसंगी बी वॉर्ड अन्याय निवारण समितीचे अध्यक्ष रामेश्वर पतकी यांनी पूर परिस्थितीच्या काळात शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासनाने ३५० प्रवाशांची व्यवस्था आणि पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे नियोजन करून केलेल्या मदतकार्याबद्दल विद्यापीठ प्रशासनास धन्यवाद दिले. याप्रसंगी हुतात्मा क्रांती संस्थेचे गुरुदत्त म्हाडगुत आणि राहुल चौधरी यांनी डॉ. इस्माईल पठाण लिखित 'छ. संभाजी महाराज' हा ग्रंथ कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना भेट दिला. याप्रसंगी शाल देऊन किसनराव कल्याणकर यांच्या हस्ते कुलगुरूंचा सन्मान करण्यात आला.



**कोल्हापूर : पूरस्थितीत मदतकार्य केल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर देवानंद शिंदे यांचा सत्कार करताना बी वॉर्ड अन्याय निवारण कृती समितीचे कार्यकर्ते.**

यावेळी या सत्काराला उत्तर देताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी हा सत्कार अत्यंत मोलाचा असून शिक्षकदिनी केलेल्या या सत्काराबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, सिनेट सदस्य राम तुपे, शिवाजी विद्यापीठ सेवक संघाचे उपाध्यक्ष अजय आयरेकर, सुरेश पाटील, उद्योजक सतीश पोवार, हुतात्मा क्रांती संस्थेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज जगताप यांच्यासह संस्थेचे सभासद उपस्थित होते.